REGISTERED No. B. 3434

अर्थशास्त्र, व्यापार,
उद्योगधंदे, बँकिंग,
सहकार, इत्यादि
विषयांस वाहिलेलें
एकमेव मराठी
साप्ताहिक
स्थापना : १९३५

# अर्थ

प्रत्येक बुधवारीं
प्रसिद्ध होतें.
वर्गणीचे दर :
वार्षिक : ६ रु.
सहामाही : ३ रु.
किरकोळ : २ आ.
दुर्गाधिवास, पुणें ४.

*"अर्थ एव प्रधानः" इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति । —कौटिलीय अर्थशास्त्र*

वर्ष १६ | पुणें, बुधवार तारीख १४ जून, १९५० | अंक २४

श्री — श्री — श्री — श्री — श्री

श्री

## दी बृहन्महाराष्ट्र शुगर सिंडिकेट लिमिटेड, पुणें २.

### युद्धोत्तरकालांत सिंडिकेटच्या सर्वांगीण वाढीच्या योजना आखल्या जात आहेत.

कंपनीनें ऑर्डिनरी शेअरवर १० टक्के डिव्हिडंड दिलें आहे.

सी. जी. आगाशे आणि कं.,
मॅनेजिंग एजंट्स.

श्री — श्री — श्री — श्री — श्री

पांच हॉर्स पावरचें
डिझेल एंजीन
घ्यावयाचें म्हणजे तें किर्लोस्कर पीटरच ! संपूर्ण पंपिंग सेटही मिळेल. चौकशी करा.
केळकर बंधू, लक्ष्मी रोड; पुणें शहर.

## विविध माहिती

**चीनमध्यें कापसाची वाढती लागवड**—चिनी कम्युनिस्टांनीं उत्तर किआंगसू प्रांतांत २॥ लाख हेक्टर जमिनींत कापसाची नव्यानें लागवड केली आहे. शांघाय व किआंगसू येथील कापडाच्या गिरण्यांना कापसाचा नियमित पुरवठा करण्यासाठीं ही योजना अंमलांत आणलेली आहे. ह्या भागांतील कापसाचें उत्पादन तीन वर्षांत युद्धपूर्वकालाइतकें वाढविण्याचा चिनी सरकारचा विचार आहे.

**बुकबाइंडिंगच्या यंत्रांस मागणी**—लंडन येथें आंतरराष्ट्रीय बुक बाइंडिंग मशिनरी एक्झिबिशन नुकतेंच भरविण्यांत आलें होतें. बुकबाइंडिंग करणाऱ्या यंत्रांना परदेशाहून २,५०,००० पौंड—३३·३३ लाख रुपये—किंमतीच्या मागण्या आल्या. त्यांत कांहीं मागण्या भारताकडून आल्या. ह्याच प्रदर्शनांत दर तासाला कोणत्याही आकाराच्या ४,००० विविध रंगीत भित्ति-पत्रिका छापणारें एक यंत्रही ठेवण्यांत आलें होतें. अशा प्रकाराचें प्रदर्शन हें पहिलेंच आहे असें म्हणतात.

**इजिप्तमध्यें शस्त्रास्त्रांचे कारखाने**—इजिप्तच्या पार्लमेंटच्या आर्थिक समितीनें देशांत शस्त्रास्त्रांचे कारखाने काढण्यांत यावेत आणि नाविक दलासाठी दोन आधुनिक विनाशिका खरेदी करण्यांत याव्यात अशी शिफारस केली आहे. देशाच्या अंदाजपत्रकांपैकीं २५ टक्के रकम युद्ध आणि नाविक खात्यांवर खर्च करण्यांत यावी असेंहि मत समितीनें व्यक्त केलें आहे. इजिप्त आणि ब्रिटन ह्यांच्या दरम्यान, इजिप्तमधील ब्रिटिश फौज काढून घेण्यासंबंधीं वाटाघाटी चालू आहेत.

**पाकिस्तानांत कागदाचा नवा कारखाना**—पूर्व पाकिस्तानांत कागदाचा धंदा काढण्याचा पाकिस्तान सरकारचा विचार आहे. ह्या कारखान्यासाठी लागणारी यंत्र-सामुग्री विकण्यासाठी एक स्वीडिश कंपनी आपला प्रतिनिधी लवकरच पाकिस्तानांत धाडीत आहे. झाडापासून तयार होणारा रांधा तयार करण्याच्या कामांतील एक तज्ज्ञही ह्या प्रतिनिधीबरोबर जाणार आहे. हे दोघे मिळून कागदाचा धंदा काढण्याच्या शक्यतेची पहाणी करणार आहेत.

**जपानची कापडाची निर्यात**—ह्या वर्षी जपानकडून १,००,००,००,००० वार कापडाची निर्यात करण्यांत येईल असा अंदाज करण्यांत आला आहे. जानेवारी ते एप्रिल ह्या चार महिन्यांत ५२,७५,९०,००० वार कापड निर्यात करण्यांत आलें. त्यावरून वरील अंदाज केलेला आहे. गेल्या वर्षी ब्रिटननें ९०,३०,००,००० वार कापड निर्यात केलें होतें. हा जागतिक उच्चांक जपानची कापड निर्यात मागें टाकणार असें दिसतें.

**बनारसची औद्योगिक पहाणी**—बनारस शहराची औद्योगिक पहाणी करण्यासाठी डिस्ट्रिक्ट को. डेव्हलपमेंट बोर्डे फेडरेशननें तिघा जणांची एक कमिटी नेमली आहे. शहरांत साबण, तेल, इत्यादि तयार करणारे छोटे उद्योगधंदे काढतां येणें कितपत शक्य आहे ह्यासंबंधी कमिटी चौकशी करणार आहे.

**घरासाठी सरकारी कंपनी**—निराश्रितांना घरें बांधून देण्यासाठी भारतीय सरकार एका बँकेच्या सहकार्यानें एक कंपनी काढणार आहे. कंपनीचें भांडवल ५० लाखांचें असून त्यांतील निम्में विक्रीस काढण्यांत येणार आहे. एकूण भांडवलापैकीं ५१ टक्के भांडवल सरकार घालणार असून उरलेलें ४९ टक्के सार्वजनिक विक्रीसाठी खुलें ठेवण्यांत येणार आहे.

**सोडा ॲशवर जकात**—पाकिस्तानांतून भारतांत आयात करण्यांत येणाऱ्या सोडा ॲशच्या किंमतीवर ५० टक्के आयात कर घेण्याचें भारतीय सरकारनें ठरविलें आहे. पाकिस्तानांतून आयात होणाऱ्या सोडा ॲशवर ह्यापूर्वी जकात घेतली जात नव्हती.

**कोळसा खाणींतून मजूर जाऊं लागले**—ब्रिटनच्या कोळशाच्या खाणींत काम करणारे मजूर दर महिन्याला १,००० नीं कमी होत आहेत असें समजतें. तरी सुद्धां खाणी कामगारांनी कोळशाचें उत्पादन वाढविलें आहे. १९४५ सालीं १७,९०,००,००० टन कोळसा बाहेर काढण्यांत आला होता. १९४९ सालीं २०,३०,०२,००० टन कोळसा काढण्यांत आला.

**संयुक्त-राष्ट्रसंघाच्या चिटणीसांचा प्रचंड पगार**—संयुक्त राष्ट्रसंघाचे चिटणीस मि. ट्रिग्वी ली हे ह्या जागेसाठी पुन्हा उभे रहाणार नाहींत अशी वार्ता आहे. मि. ली ह्यांना दरवर्षी ४०,००० डॉलर्स मिळतात आणि १०,००० डॉलर्स पेन्शन मिळावयाचें आहे. त्याशिवाय नॉर्वेच्या लोकांनीं त्यांना त्या देशांत एक घरही दिलें आहे.

**मध्यभारतांतील विक्री कर**—मध्यभारत सरकारनें १ मे, १९५० पासून विक्री कर घेण्यास सुरवात केली होती. ह्या कराला राज्यांतील व्यापारी-वर्गाचा विरोध असल्यानें त्यांनीं संप केला होता. विक्री कराच्या कायद्यांत व्यापारी-वर्गानें आणि मध्यभारत चेंबर ऑफ कॉमर्सनें ज्या दुरुस्त्या सुचविल्या होत्या त्या मध्यभारत सरकारनें मान्य केल्या व त्यानंतर हा संप मागें घेण्यांत आला.

**ब्रिटनमधील गुन्हेगारींत वाढ**—इंग्लंड आणि वेल्समध्यें गुन्हेगारींत वाढ झाली आहे. गुन्हेगारांना कडक शिक्षा देण्याची व्यवस्था करून व जादा पोलीस बंदोबस्त ठेवून सुद्धां ही वाढ झाली हें विशेष आहे. १९४९ सालीं अत्याचारी स्वरूपाचे गुन्हे मागील सालापेक्षां ४७६ अधिक झाले. स्त्रियांवरील असभ्य हल्ल्यांची संख्याही ५३२ नीं वाढली. १९४८ सालीं एकूण ११,७८० गुन्हे झाले होते. १९४९ सालीं १२,२४७ गुन्हे झाले.

**हैद्राबादमधील जहागिरदारी**—हैद्राबाद संस्थानांतील जहागिरदारांना नुकसानभरपाई म्हणून १८,००,००,००० रुपये देण्यांत येणार आहेत. ह्या रकमेपैकी बराच मोठा भाग रोखीच्या स्वरूपांत देण्यांत येणार असून बाकीच्या रकमेचे कर्जरोखे देण्यांत येतील असें समजतें. जहागिरीवर काम करणाऱ्या ३,००० नोकरांपैकी १,५०० लोकांना सरकारी नोकऱ्या देण्यांत आल्या आहेत. बाकीच्यांना सढळ हातानें पेन्शनें देण्यांत येणार आहेत.

**मोटार विक्रीचा विक्रम**—१९५० च्या पहिल्या तिमाहींत अमेरिकेंतील मोटार कारखान्यांतून १३,७६,००० नवीन मोटारी विकल्या गेल्या.

—सर्व प्रांतांतील—
सुती-गरम-रेशमी
—खादीचें माहेरघर—
खादी मन्दिर
२६१, बुधवार पेठ
दमडेरे बोळाजवळ,
पुणें २.

# अर्थ

बुधवार, ता. १४ जून, १९५०



संस्थापक :
प्रो. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे

## सिड्नेे परिषदेची फलश्रुति–आर्थिक प्रश्नांकडे वास्तवतेनें पाहाणें.

सिड्नेे परिषदेंत मिळालेलें यश ढोळे दिपवून टाकणारें नसलें तरी आशियांतील राष्ट्रांना परिस्थितीची जाणीव करून देण्याच्या दृष्टीनें व राष्ट्राराष्ट्रांतील सहकार्य वाढविण्याच्या दृष्टीनें मिळालेलें यश महत्त्वाचें समजलें पाहिजे. देशांतील लोकांच्या राहाणीच्या मानाची अधोगति थांबवून धरली पाहिजे हें तत्त्व सिड्नेे परिषदेंत मान्य झालें ही गोष्ट नवीन भांडवल गुंतविल्यानें सिद्ध होईल असें सामान्यतः मानलें जातें. परंतु ही समजूत नेहमींच खरी किंवा बरोबर नसते. उदाहरणार्थ, खुद्द हिंदमध्यें कापड, ताग व साखर यांचें उत्पादन वाढविण्यास जास्त भांडवल गुंतविण्याची मुळींच जरूरी नाहीं, तर आहे ह्या साधनसामुग्रीतच जास्तींत जास्त उत्पादन काढतां येईल या दृष्टीनें प्रयत्न झाले पाहिजेत. ऑस्ट्रेलियामध्यें पोलादाची आयात केली जाते, परंतु वस्तुस्थिति अशी आहे कीं, तेथील कारखान्यांनाच आहे या परिस्थितींत पोलादाचें उत्पादन वाढवितां येणें शक्य आहे. साहित्य व मनुष्यबळ यांच्या अभावीं मोटारगाड्यांचें उत्पादनही ऑस्ट्रेलियांत कमी प्रमाणांत होत आहे. सारांश, हिंद–ऑस्ट्रेलिया या दोन देशांत नवीन भांडवली खर्च न करतां अस्तित्वांत असलेल्या कारखान्यांचें उत्पादन पुष्कळ प्रमाणांत वाढवितां येण्यासारखें आहे व त्यामुळें आग्नेय आशियांतील देशांना गिऱ्हाइकी मालाचा पुरवठा जास्त होऊं शकेल. या गोष्टींकडे सिड्नेे परिषदेचें लक्ष गेलें असावें, कारण इतर देशांकडून यंत्रशास्त्रज्ञांची मदत मिळण्यापेक्षांहि स्वतःच्या प्रयत्नांनीं अंतर्गत उत्पादनाचा प्रश्न जास्त चांगल्या रीतीनें सुटूं शकेल असा दृष्टिकोन दिसून आला. शेतीचें उत्पन्न वाढविण्यासाठी मात्र भांडवली खर्च करावा लागेल. निरनिराळ्या देशांतील व्यापारी देणीं भागविण्यासाठींहि दुसऱ्या देशांकडून मदत हा मार्ग नसून व्यापाराची स्थिति सुधारणें हा खरा मार्ग आहे.

आग्नेय आशियांतील देशांना तांत्रिक मदत देण्यासाठी ८० लक्ष पौंड निधी उभारण्यांत येणार आहे. आग्नेय आशियांतील राष्ट्रांचे आजच्या जगांत कांहीं स्वतंत्र प्रश्न आहेत व हा एक राष्ट्रांचा गट आहे याकडे सिड्नेे परिषदेनें लक्ष केंद्रिभूत केलें असें म्हणावयास हरकत नाहीं. या गटाचें महत्त्व स्टर्लिंग क्षेत्रांत येणाऱ्या देशांच्या दृष्टीनें विशेष आहे हें लक्षांत येण्यासारखें आहे. हा गट जितका आर्थिक दृष्ट्या प्रबळ बनेल तितक्या प्रमाणांत डॉलर गटांतील देशांशीं संबंध सुधारत जातील.

या परिषदेंत विशेषतः ब्रिटन, हिंद व ऑस्ट्रेलिया यांच्याच प्रतिनिधींनीं खरा भाग घेतला. निरनिराळ्या देशांच्या विशिष्ट गरजा काय आहेत याबद्दल आंकड्यासह माहिती मिळविण्यांत यावी असें या परिषदेंत ठरलें. या परिषदेंतून असाहि एक महत्त्वपूर्ण निर्णय बाहेर पडला कीं ज्या देशांना आज किंवा सध्यां कॉम्युनिझमची भीति नाहीं अशा देशांनींहि स्वतःचीं आर्थिक परिस्थिति सुधारण्याकडे विशेष लक्ष दिलेंच पाहिजे, साम्राज्यांतील देशांकडून मदतीची अपेक्षा केली गेली तरी सुरवातीचा पहिला मार्ग म्हणजे प्रत्येक देशानें स्वतःच्या प्रयत्नांनींच आपली सुधारणा करणें हा होय.

## इन्कम टॅक्स मधून माफी: हायकोर्टाचा अभिप्राय

[ इनकम टॅक्सबाबत टाटा सन्स लि. च्या प्रकरणांत मुंबई हायकोर्टानें १५ मार्च, १९५० रोजीं केलेला खालील निवाडा अत्यंत महत्त्वाचा व मॅनेजिंग एजंटांना मार्गदर्शक आहे. ]

टाटा आयर्न अँड स्टील कंपनीचे मॅनेजिंग एजंटस, टाटा सन्स लि., ह्यांना कराराप्रमाणें टाटा कंपनीकडून तिच्या निव्वळ नफ्याच्या कांहीं टक्के कमिशन मिळावयाचें होतें. टाटा कंपनीनें आपल्या कांहीं अधिकाऱ्यांना कांहीं रकम दिली, तिच्यांत टाटा सन्स लि. नेंहि आपल्या नफ्यांतून कांहीं भर घातली. ह्या रकमेस इनकम टॅक्स मधून माफी मिळावी, असें टाटा सन्स लि. चें म्हणणें होतें. "असेसी कंपनीनें ( टाटा सन्स लि. नें ) मॅनेज्ड कंपनीचा ( टाटा आ. अँड स्टी. कं. ) नफा वाढवून पर्यायानें स्वतःच्या कमिशनचा वाटा वाढविण्याच्या उद्देशानेंच हें केलें. ह्या दृष्टीनें, हा खर्च तिच्या स्वतःच्या बिझिनेससाठीच होता असें धरलें पाहिजे. म्हणून तो खर्च १० ( २ ) XV ह्या कलमाखालीं नफ्यांतून वजा घालतां येईल. १० ( २ ) XV ह्या कलमाचा अर्थ लावतांना, योग्य खर्च कोणता एवढेंच तात्विक दृष्ट्या न पहातां, व्यापारी पद्धति व व्यवहार हींहि विचारांत घेतलीं पाहिजेत. नफा मिळविण्यासाठी खर्च झाला आहे का? हा मुख्य प्रश्न कोर्टानें विचारांत घेतला पाहिजे. असेसीला नफा मिळविण्यास व वाढविण्यास मदत होत असेल, तर तो खर्च धंद्यासाठीच केला, असा अर्थ होतो. व्यापारी कारणासाठी आपण होऊन एकादी गोष्ट केली, तरी ती वरील कलमांत बसते. नफा मिळविण्यासाठी किंवा वाढविण्यासाठी मात्र ती गोष्ट केलेली असली पाहिजे. १० (२) X आणि १० (२) XV ह्या कलमांचा मेळ घालता येण्याजोगा आहे. तीं परस्पर विरोधी नाहींत." असा हायकोर्टानें अभिप्राय दिला.

## मोठ्या रकमेच्या चलनी नोटा पुनः सुरू करा

पांचशे, हजार व दहा हजार रुपयेवाल्या नोटा १९४६ सालीं गव्हर्नर जनरलच्या एका ऑर्डिनन्सनें रद्द ठरविल्या. ह्या नोटांच्या स्वरूपांत साठविलेले नफे बाहेर येऊन त्यांची रकम बँकेंत जमा व्हावी हा उद्देश बव्हंशीं सफल झाला, परंतु नफेबाजीस व काळ्या बाजारास कितपत आळा त्यामुळें बसला हें कांहीं सांगता येत नाहीं. त्यानंतर ह्या मोठ्या रकमांच्या नोटा काढण्यांत आलेल्या नाहींत. त्या कारणानें बँकांची व व्यापाऱ्यांची गैरसोय होते. नोटा मोजण्यास पूर्वीच्या मानानें १० पट वेळ लागतो, आणि नोटांची बंडलेंच्या बंडलें इकडून तिकडे न्यावीं लागतात. हें अर्थातच धोक्याचें असतें. तेव्हां, सरकारनें ह्या नोटा पुनः काढण्यास प्रारंभ करावा असें सुचाविण्यांत येत आहे. ह्या नोटांच्या अभावी होणारी गैरसोय सोसण्यास हरकत नव्हती, परंतु त्याबरोबर काळाबाजार आणि कर चुकविण्याचे प्रकार ह्यांस आळा बसावयास हवा होता, असें प्रतिपादन करण्यांत येत आहे.

## उत्पादनवाढ व मजुरी

( ले.:—श्री. ग. कृ. चितळे, बी. कॉम्., मुंबई–पुणें. )

"फ्री प्रस"मधील एका बातमींत, जिनेव्हाच्या आय्. एल्. ओ. च्या बाबत एक वृत्त प्रसिद्ध झालें आहे, त्यांत म्हटलें आहे कीं येत्या तेहतिसाव्या परिषदेंत मजुरी वाढविण्याबाबत महत्त्वाचा विचार-विनिमय होणार आहे. तत्त्व सांगण्यांत आलें तें असें कीं "मजुरींत वाढ व्हावी ती उत्पादन वाढवून". म्हणजे, उत्पादनाचें किमान ठरवावें व त्यापेक्षां जास्त उत्पादन केल्यास जास्त मजुरी मिळावी. या दिशेनें आपल्याकडेही पुढें पाऊल पडणें इष्ट आहे.

सध्याचे दिवसांत परिस्थिती काय आहे? कामगारवर्ग फक्त रुपये आणे पै यांत वाढ मागतो. दिलेल्या रुपयाचे मोबदल्यांत योग्य व भरपूर काम करून देण्याची कल्पना त्यांना नाहीं. फक्त जास्त पगार व नव्या नव्या सवलती यांची मागणी करीत राहणें हीच मजुरांची चळवळ. ही वृत्ति साफ पालटली पाहिजे.

बरें हाच मजूर माल खरेदी करण्यास जातो व रुपयाचे मोबदल्यांत वस्तू घेतो त्यावेळीं कसा वागतो तें पहा. समजा तो भाजी घेत आहे तर तो पहिल्यांदा भावांत घासाघीस घालील, मग मापतोल याबद्दल व मागाहून तोलाबाहेर एकादा नग टाक म्हणेल. त्याला कांहीं कमी खपावयाचें नाहीं.

पण जेव्हां तो स्वतःचा "माल" म्हणजे "श्रम" विकतो त्यावेळीं तोच मजूर अगदीं उलट वागतो. तो थोडा उशीर करून कामावर जाईल, हलके हलके अळंटळं करीत काम करील. सामानाच्या नासधुसीकडे तो फारसें लक्ष देणार नाहीं, मशीन व हत्यारें काळजीपूर्वक वापरणार नाहीं व शेवटीं कामाचा योग्य मोबदला दिला पाहिजे हें साफ विसरून, दिवस कसाबसा पुरा करून मालकाला नांवें ठेवीत निघून जाईल. स्वतः असंतुष्ट, असमाधानी तर मालकही तिकडे असंतुष्ट व असमाधानी. ही परिस्थिति साफ साफ बदलली पाहिजे. ( एकादा कारखाना याला अपवाद असेल. ) मजुरानें, कारागिरानें, कामगारानें आपला "माल" म्हणजे "श्रम" विकतांना, भरपूर माप दिलें पाहिजे हें सरळ मागणें आहे. जसा घेण्यासाठीं हात पुढें तसा तो देतांनाही पुढें पाहिजे.

सध्याचें सरकार अधिकारावर आल्यापासून त्यानें कामगारांसाठी फार फार केलें आहे. मजुरी वाढली, कामाचे तास कमी झाले, आठवड्याची सुट्टी, घातपाताची पूर्ण भरपाई, पगारी रजा, वैद्यकीय मदत, कॅन्टीन, वगैरे सोयी व यापुढें "विमा". हें करतांना, सरकारनें कामगारांचे मनावर हीही गोष्ट ठसून बिंबवायास पाहिजे होती कीं कामगारांनीं भरपूर व योग्य काम केलेंच पाहिजे. या वेळपर्यंत तसें झालें नाहीं. आतां "जास्त उत्पादन" अशी मागणी करावी लागत आहे व त्या अनुरोधानें पुरेपूर उत्पादन कामगारांनीं द्यावें असें सुचविण्यांत येऊं लागलें आहे. परिस्थिति पालटत आहे. कारखान्यांचे नफे घसरगुंडीला लागले आहेत, कारखाने (गिरण्या) पुष्कळ ठिकाणीं बंद पडत आहेत व मजूर—कामगार, बेकार होऊं लागले आहेत व मजुरीचे प्रमाणांत उत्पादन मिळत आहे कां हा प्रश्न विचारांत घेण्यांत येऊं लागला आहे.

पाश्चात्य देशांत, "उत्पादन वाढवा व जास्त मजुरी घ्या." असा विचारप्रवाह सुरू. आपल्याकडेही वेळेवर असाच विचार सुरू होऊन त्याप्रमाणें व्यवस्था व्हावयास पाहिजे. आपलेकडेही शास्त्रीय पद्धतीनें आठ तासांत, असलेल्या यंत्रावर, असलेल्या सामुग्री व साधनावर, कच्च्या मालांतून किती उत्पादन साधारण कामगार करूं शकेल हें ठरविलें पाहिजे व कामगार पुढाऱ्यांनीं, कामगार असें ठरलेलें उत्पादन देतो हें पाहिलें पाहिजे. कामगारानें ठरल्या इतका चांगल्या दर्जाचा माल काढला पाहिजे. मजुराप्रमाणें, मालकासही भरपूर व चांगल्या दर्जाचा माल काढून मिळाला तरच यापुढें तरणोपाय. साधारणपणें सर्वच मालक आपल्या हिताबद्दल जागरूक असतात व कबूल केल्याप्रमाणें वागतात. पण कांहीं फसवेही असूं शकतील. मालकांनीही ठरलेल्या दर्जाचाच कच्चा माल पुरविला पाहिजे व अशा रीतीनें कामगारांचा विश्वास संपादन केला पाहिजे. मजुरांनींही एकाद दुसऱ्या फसव्या मालकाचें उदाहरण देऊन सर्वच मालकांना नांवें ठेवणें योग्य नाहीं.

सध्या मालक-कारखानदार हे "उत्पादन व मजुरी" यांचे संबंध ठरवूं मागूं लागले आहेत व त्याप्रमाणें मालक—कारखानदार व कामगार व कामगारपुढारी यांनीं आपसांत हें ठरवावें व जरूर तेथें एकसर्पटची मदतही घ्यावी. यावेळीं मालक—मजूर यांनीं या बाबीकडे फार लक्ष देऊन परिस्थिति सुधारली पाहिजे व उत्पादन वाढविलें पाहिजे. मग पुढची पायरी. ठरलेल्या उत्पादनापेक्षां, कार्यक्षमतेमुळें व दर्जा न उतरवितां जो जास्त उत्पादन काढील त्यास त्या प्रमाणांत जास्त मजुरी द्यावी, हें ओघानेंच येईल.

एक गोष्ट मालक—कारखानदारांनीं करावी असें वाटतें ती म्हणजे, लढाईचे काळांतील व त्यानंतर कांहीं वर्षें जसे भरमसाट नफे मिळविले तसेच यापुढेंही मिळत रहावे ही कल्पना अथवा भावना सोडणें. लढाईपूर्व काळांत नफ्याचें प्रमाण होतें तें, ( किंवा साधारण दहा टक्के ) गृहीत धरून हिशोब ठेवावा, किंमती ठरवाव्यात व मजुरांना आपल्या विश्वासांत घेऊन, त्यांच्यांत कारखान्याबद्दल आपुलकीची भावना उत्पन्न करून यापुढें वागावें. तरच तरणोपाय आहे. आपला मागासलेला परंतु महत्त्वाकांक्षी महाराष्ट्र असें करील का?

वरील तत्त्व गृहीत धरल्यानंतर, किमान उत्पादन व त्याचा मोबदला हें ठरविणें जरूर आहे. प्रत्येक वस्तूचें उत्पादन ठरवितांना आजूबाजूच्या सर्व गोष्टी विचारांत घ्याव्या लागतील व म्हणून सर्वसाधारण नियम घालून देणें कठीण, परंतु अशक्य नाहीं. कारखानदार व कामगार यांनीं थोडीफार बाहेरची मदत घेऊन हें आपसांत ठरवावें, त्याचवेळीं नासधूस न करतां, दर्जा न उतरवितां जास्त काम देणारास बोनस किंवा भत्ता ठरवावा. कच्च्या मालाची प्रत ठरवावी व शक्य तेथें सीलबंद नमुने ठेवावेत. कच्च्या मालाचा दर्जा उतरल्यास कांहीं वेळा हलका माल आणावा लागेल. मजुरींत थोडी त्या प्रमाणांत वाढ करण्याचें अगोदर ठरवून द्यावें. अशा रीतीनें हा प्रश्न सोडविणें शक्य आहे व तसा तो कारखानदार-कामगारांनीं सोडवावा.

---

**चहाच्या निर्यातीवरील जकातवाढ**—सीलोन टी प्रॉपेगँडा बोर्डानें कॅनडा आणि अमेरिका ह्या देशांतून आपल्या चहाची जाहिरात अधिक मोठ्या प्रमाणावर करण्याचें ठरविलें आहे. ह्या जाहिरातीसाठीं लागणारा खर्च चहाच्या निर्यातीवर घेण्यांत येणाऱ्या जादा आकारांत वाढ करून भागविण्यांत येणार आहे. आतांपर्यंत दर १०० पौंडा मागें १ रु. जादा आकार घेण्यांत येत असे, त्याऐवजी तो १·७० रुपये येईल.

**पोप आणि बेकारी**—पोप पायस ह्यांनीं जगांतील बेकारीसंबंधीं असे उद्गार काढले कीं, ह्या त्रासदायक बाबीमुळें आंतरराष्ट्रीय क्षेत्रांतील थंड्या युद्धाचें खऱ्या युद्धांत रूपांतर होण्याचा संभव आहे. सध्या बेकारीचा प्रश्न हा फार आणीबाणीचा होऊन बसला आहे.

## भारताच्या आर्थिक रोगाचें निदान

(इंग्लंडमधील मँचेस्टर गार्डिअनच्या खास वार्ताहरानें भारताच्या आर्थिक अनवस्थेची केलेली ही मीमांसा बोधप्रद नाहीं काय?)

सिडने येथें नुकत्याच भरलेल्या परिषदेंत दक्षिण आणि आग्नेय आशिआंतील देशांच्या आर्थिक परिस्थितीचा विचार करण्यांत आला. आशिआच्या ह्या भागांत भारताच्या अर्थव्यवस्थेला फार महत्त्व आहे. भारताची अर्थव्यवस्था जर प्रगति करूं शकली तर आग्नेय आशिआचे प्रश्न अंशतः तरी सुटण्याची शक्यता आहे. भारतांतील अर्थव्यवस्थेंत सध्या जी अनवस्था उद्भवली आहे तिला दोन कारणें मुख्यतः जबाबदार आहेतः- (१) लोकसंख्येची वाढ, आणि (२) ब्रिटनकडून मिळूं शकणाऱ्या भांडवलाची कमतरता.

### वाढती लोकसंख्या व धान्याची आयात

भारतांतील लोकसंख्या अन्नोत्पादनाच्या व्यस्त प्रमाणांत वाढत आहे ह्याबद्दल कोणासही शंका नाहीं. दरवर्षी लोकसंख्येंत पडणारी भर लक्षांत घेतां भारतांतील अन्नधान्याची जरूरी दरवर्षी ४,००,००० टनांनीं वाढत आहे. लोकसंख्येची वाढ सध्याप्रमाणें न होतां थोड्याशा कमी प्रमाणांत झाली, तरीसुद्धां अन्नधान्याची टंचाई भासणारच आहे. कारण, १९२१ सालापासूनच लोकसंख्या आणि अन्नधान्याचें उत्पादन ह्यांच्यांतील समतोलपणा नाहींसा होत चाललेला आहे. भारताची फाळणी झाल्यापासून तर अन्नधान्याची परिस्थिति अधिकच बिघडली आहे. प. पंजाब आणि सिंध हे प्रांत आतां पाकिस्तानांत समाविष्ट झाले आहेत. ह्या प्रांतांतूनच वरकड गहूं भारताला मिळत असे. अर्थातच, अन्नधान्य आयात करण्याची गरज वाढली. १९४७ सालीं भारतानें २६,००,००० टन धान्य आयात केलें. १९४८ सालीं ४०,००,००० टन आयात केलें. भारताच्या अन्नखात्यानें १९५० सालीं १५,००,००० टनांपेक्षां अधिक अन्नधान्याची आयात करावयाची नाहीं असें ठरविलें आहे. परंतु हा आंकडा आतांच २०,००,००० टनांपर्यंत वाढवावा लागला असून वर्षाअखेर कदाचित् मागील सालाच्या आयाती इतका वाढण्याचाही संभव आहे. भारताला लागणारा तांदूळ मुख्यतः ब्रम्हदेश आणि आग्नेय आशिआंतील देशांकडून आयात करण्यांत येत असे. ब्रम्हदेशांतील राजकीय परिस्थिति अस्थिर असल्यामुळें तांदुळाचें उत्पादन घटलें आहे. आज ब्रम्हदेशांतून सरासरी १० लक्ष टनांपेक्षां अधिक तांदूळ निर्यात होत नाहीं. ब्रम्हदेशांत ब्रिटिशांचें राज्य होतें त्यावेळीं भात पिकूं शकणाऱ्या जमिनींपैकीं निम्मी जमीन चेट्टियार सावकारांच्या मालकीची होती. आतां ही जमीन चेट्टियार (दक्षिण हिंदुस्थानांतील सावकार) लोकांच्या मालकीची राहिलेली नाहीं. सामाजिक आणि राजकीय दृष्ट्या ती ब्रम्हदेशांतील शेतकऱ्याच्या मालकीची रहाणें योग्य आहे. परंतु, आर्थिक दृष्ट्या ब्रम्हदेशाचें ह्यामुळें नुकसान झालें आहे. चेट्टियार सावकारांच्या हातीं जमीन होती त्यावेळीं तांदुळाचें उत्पादन जेवढें होत असे, तेवढें आतां होत नाहीं आणि होणें शक्यही नाहीं. ब्रम्हदेशांतून तांदूळ मिळण्याची शक्यता नसल्यानें भारताला ऑस्ट्रेलिया आणि अमेरिका ह्या देशांकडून गहूं अधिक प्रमाणांत आयात करावा लागत आहे.

### भांडवलाचा तुटवडा

भारताला स्वातंत्र्य मिळाल्यापासून ब्रिटिश भांडवलाचा तुटवडा पडूं लागला आहे. १९ व्या शतकांत ब्रिटिश भांडवल भारतांत गुंतविलें जात होतें. त्यामुळें देशाची अर्थव्यवस्था बदलली आणि लोकसंख्येची वाढ शक्य झाली. ब्रिटिश भांडवल मुख्यतः रेल्वे, पाटबंधारे, बंदरें व उद्योगधंदे ह्यांतून गुंतविलें गेलें होतें. भारतांत गुंतविलेल्या ब्रिटिश भांडवलाचा नक्की आकडा निश्चित करण्यांत आलेला नाहीं. ब्रिटनकडून होणाऱ्या भांडवलाचा पुरवठा आटल्यामुळें भारताची अर्थव्यवस्था पुन्हां अगतिक झाली आहे. भारताचें राष्ट्रीय उत्पन्न इतकें कमी आहे कीं त्यांतून भांडवलाची उभारणी करणें शक्य नाहीं. दुसरें असें कीं, भारतांतील ग्रामीण बाजारपेठ मंदीची आहे. त्यामुळें उद्योगधंद्यांना वाव राहिलेला नाहीं. जें कांहीं थोडें–फार हिंदी भांडवल आहे त्याचा उपयोग औद्योगिक उत्पादनांत न करता शेअर बाजारांत करण्यांत येत आहे. भारतांतील रेल्वेची आणि औद्योगिक यंत्रसामुग्री आतां जुनी झाली आहे. युद्धकाळांत रेल्वे आणि औद्योगिक कारखाने ह्यांना लागणारें यांत्रिक साहित्य आजिबात मिळूं शकलें नाहीं. युद्ध संपल्यानंतर बऱ्याच काळानें हिंदी भांडवलदारांना नवीन यंत्रसामुग्री मिळाली. युद्धानंतर भारताला स्वातंत्र्य मिळालें. हिंदी भांडवलदारांपैकीं बहुतेक उद्योगपती काँग्रेसला अनुकूल आहेत. परंतु त्यांचा नव्या सरकारवर फारसा विश्वास नाहीं. १९४४ सालीं हिंदी उद्योगपतींनीं एक औद्योगिक योजना तयार केली होती. परंतु ती पुरी करण्याची आशा आतां मावळली आहे. पं. नेहरू समाजवादी धोरणाचीं भाषणें करतात, तीं उद्योगपतींना सरकारच्या नव्या धोरणाची दिशा दाखविणारीं वाटतात. त्यामुळें कांहीं महिने हिंदी भांडवलानें एक प्रकारचा संपच पुकारला होता. परंतु गेल्या सहा महिन्यांत हिंदी भांडवल पुन्हां पुढें येऊं लागलें आहे.

तात्पर्य, सध्या भारतांत लोकसंख्या वाढत आहे आणि बाकी सर्व आहे तसेंच आहे. गोल्डस्मिथनें त्याच्या वेळच्या इंग्लंडविषयीं असें म्हटलें होतें कीं, "ह्या देशांत संपत्ति वाढत आहे आणि माणसें पिचत आहेत." भारतांत ह्याच्या उलट परिस्थिती आहे. भारतांत माणसें वाढत आहेत आणि संपत्ति कुजत आहे. हें असें किती दिवस चालणार?

---

**माहुताला अमेरिकन कंपन्यांकडून बोलावणें**—पं. जवाहरलाल नेहरू ह्यांनीं अमेरिकन मुलांना 'शांति' आणि 'अशोक' हे दोन हत्ती भेटीदाखल दिले त्यावेळीं त्यांचा माहूत बाबा जान हाहि त्यांच्याबरोबर अमेरिकेंत गेला होता. बाबा जानला अमेरिकेंतील बऱ्याच बोलपट कंपन्यांकडून आणि सर्कसवाल्यांकडून नोकरीसाठी विचारण्यांत आलें आहे. एका सर्कसवाल्यानें तर आणखी चार हत्ती आणि एक माहूत घेऊन बाबा जानला बोलावलें आहे.

**कच्च्या रेशमाची आयात**—मुंबई राज्याच्या सरकारनें ३५,००० रु. किंमतीचें कच्चें रेशीम आयात करण्याचें ठरविलें आहे. कांहीं रेशीम जपानमधून आणि कांहीं सुलभ चलनाच्या देशांतून आयात करण्यांत येणार आहे. रेशीम आयात झाल्यावर तें हातमाग आणि यांत्रिक माग ह्यांच्यासाठी वाटण्यांत येणार आहे. रेशीम बंदरांत आल्यावर त्याची जी किंमत असेल त्यापेक्षां ४ टक्के अधिक किंमत गिऱ्हाइकांकडून घेण्यांत येईल.

**पाकिस्तानांत कापडाची गिरणी**—दमास्कस चेंबर ऑफ कॉमर्सचे एक प्रतिनिधी सध्या पाकिस्तानांत आले आहेत. सिरिआमधील एक कापडाची गिरणी पाकिस्तानमधील हैद्राबाद शहरांत अगर भावलपूर संस्थानांत उभारण्याचा त्यांचा विचार आहे. ह्यासंबंधीं पाकिस्तान सरकारशीं ते वाटाघाटी करीत आहेत.

## मालाच्या पॅकिंगकडे लक्ष द्या

### भारताकडे माल पाठविणारांना सूचना

माल निर्गत करतांना, खरेदीदार बाजारपेठांच्या आवडी-निवडीकडे कसें लक्ष द्यावें लागतें आणि अगदी किरकोळ तपशीला-पर्यंत पहाणी कशी करावी लागते, ह्याचें उदाहरण म्हणून भारताकडे माल पाठविणाऱ्या ऑस्ट्रेलियन व्यापाऱ्यांना दिलेल्या सूचना येथें उद्धृत करीत आहों:–

मालावर योग्य लेबलें नसलीं, परंतु आंतील माल लेबलाच्या खोक्यांतील मालाप्रमाणेंच असला तरी हिंदी व्यापारी तो पत्करीत नाहींत. म्हणून खोक्यांवर लेबलें काळजीपूर्वक लावावींत. भारतांत मालाच्या वहातुकींत त्याची खराबी होते, अनेक ठिकाणीं तो चढवावा–उतरवावा लागतो. म्हणून मोडतोड व चोरी ह्यांस वाव राहूं नये इतकें मजबूत पॅकिंग असलें पाहिजे. हिंदी लोकांना रंगीत गोष्टी आवडतात, परंतु ऑस्ट्रेलियन लोकांना जी रंगसंगती पसंत पडेल तीच भारतीयांना पडेल, असें सांगतां येणार नाहीं. भारतांत वापरावयाचीं लेबलें रंगीतच असावींत. मुस्लिम किंवा कॉंग्रेस निशाणाचे रंग लेबलासाठीं वापरले तर ते आकर्षक होतात. भारतांतील ९०% जनता निरक्षर आहे. तेव्हां लेबलावर मालाचें ठळक चित्र काढावें; अक्षरें शक्य तेवढीं कमी असावींत. मालाबरोबर छापील कागद पाठवावयाचे त्यावरील मजकूर हिंदी किंवा उर्दू भाषेंत असावा. डुकर हें मुस्लिमांना आणि गाय ही हिंदूंना पवित्र असल्यानें त्यांचीं चित्रें टाळावींत. खोक्यावरील लेबल फाटलेलें किंवा खराब झालेलें असलें कीं हिंदी व्यापारी तें खोकें पत्करण्यास नाखूष असतो. म्हणून अमेरिकन व इतर निर्गत व्यापार करणारांनीं आपल्या लेबलांवर व्हार्निशचा हात देण्यास प्रारंभ केला आहे. परिचित लेबलें व माल ह्यांची हिंदी मनावर पक्कड बसते. तेव्हां नवीन माल पाठवावयाचा असेल, तर भरपूर जाहिरातीची व प्रचाराची आवश्यकता आहे. सुप्रसिद्ध ब्रँड किंवा ट्रेडमार्क ह्यावरूनच निरक्षर लोक मालाचा चांगुलपणा ओळखतात. भारताकडे माल पाठवितांना लक्षांत ठेवण्याची आणखी एक गोष्ट म्हणजे, ज्यांत माल पाठविण्याचा त्या बाटल्या किंवा डबे ह्यांचें महत्त्व. माल खरेदीतांना त्याच्या बाटल्या, डबे किंवा खोकीं ह्यांस पुष्कळच महत्त्व दिलें जातें, ही गोष्ट निर्गत करणारांनीं लक्षांत ठेवावी व त्या दृष्टीनें मालाचें पॅकिंग करावें.

### नवी मशीनटूल फॅक्टरी

जलहळ्ळी ( म्हैसूर ) येथील सरकारी मशीन टूल्स फॅक्टरीच्या उभारणीसाठी स्विस तज्ज्ञ येणार आहेत. जूनमध्यें प्राथमिक कामास प्रारंभ होऊन दोन वर्षांत उत्पादन सुरू व्हावें, अशी अपेक्षा आहे.

### पहिल्या सहकारी साखर कारखान्याचा कोनशिला समारंभ

धी बागाईतदार को–ऑपरेटिव्ह शुगर प्रोड्युसर्स सोसायटी लि. लोणी. ता. श्रीरामपूर जि. अहमदनगर या संस्थेच्या शुगर फॅक्टरीच्या इमारतीचा कोनशिला बसविणेचा समारंभ ता. १७।६।५० रोजीं शनिवारीं दुपारीं २ वा. श्रीमंत मालोजीराव निंबाळकर [ उद्योग व मजूर मंत्री, मुंबई सरकार ] यांचे हस्ते वैदिक पद्धतीनें होणार आहे. श्री. ध. रा. गाडगीळ हे सोसायटीचे चेअरमन असून श्री. आर. जी. सुळे हे मॅ. डायरेक्टर व श्री. एम्. टी. तांबवेकर हे ज. सेक्रेटरी आहेत.

**डॉ. मथाई पुन: टाटांकडे गेले**–भारत सरकारचे माजी अर्थमंत्री डॉ. जॉन मथाई, हे टाटा इंडस्ट्रीज लि. चे डायरेक्टर म्हणून ता. १ जून रोजीं पुन्हां रुजू झाले आहेत.

**फिॲट ट्रॅक्टर्सची जुळणी**—मुंबई येथील प्रीमिअर ऑटोमोबाइल कंपनी इटलींतील फिॲट कंपनीकडून मागविलेल्या ५०० यांत्रिक नांगरांची जुळणी चालू वर्षी करणार आहे. फिॲट कंपनीचे अध्यक्ष आणि मुंबईची कंपनी ह्यांच्या दरम्यान ह्यासंबंधीं करार झाला आहे. युद्धापूर्वी ऑटोमोबाइल कंपनी क्रिसलर ह्या अमेरिकन मोटारींची जुळणी करीत असे. डॉलरच्या हुंडणावळीवरील निर्बंधांमुळें ह्या कंपनीला इटालिअन कंपनीशीं करार करावा लागला.

**विजेच्या उपकरणाचा कारखाना**—म्हैसूरचें सरकार संस्थानांत विजेच्या उपकरणांचा एक मोठा कारखाना काढण्याचा विचार करीत आहे. ह्या कारखान्याला सुमारें १५ कोटी रुपये भांडवल लागेल. भारतीय सरकारकडून जरूर ती मदत मिळविण्याचाही प्रयत्न करण्यांत येत आहे. अमेरिकेंतील वेस्टिंग हौस कंपनीच्या एका तज्ज्ञाकडून ह्या धंद्याच्या शक्यतेसंबंधीं एक अहवाल तयार करून घेण्यांत आला आहे.

**गरीब सरकारी नौकरांना वैद्यकीय मदत**—मद्रास सरकारनें एक हुकूम काढून दरमहा १०० रुपयापर्यंत उत्पन्न असणाऱ्या सरकारी नौकरांना मोफत वैद्यकीय मदत देण्याची व्यवस्था केली आहे. ही व्यवस्था १ जून १९५० पासून अंमलांत आली आहे. ह्यापूर्वी दरमहा ५० रुपये प्राप्ती असणाऱ्यांना ही मदत मिळत असे. नवीन योजनेमुळें मद्रास सरकारचें १ लाख रुपयांचें नुकसान होईल.

**चलनी नोटांना रद्दीचा भाव**—चांग–कै–शेकच्या राजवटींतील चलनी नोटा चीनमध्यें आतां रद्दीपेक्षांही स्वस्त भावानें विकण्यांत येत आहेत. शांघाय शहरांतील कागदाच्या गिरण्या रांध्याच्या अभावीं बंद होत्या. जुन्या नोटांचा त्यासाठीं उपयोग करून ह्या गिरण्या पुन्हा चालू करण्यांत. येणार आहेत. जुन्या नोटांचे गठ्ठेच्या गठ्ठे गिरण्या विकत घेत आहेत.

**फिल्मच्या साठ्यांना आग**—दिल्ली येथील चित्रपटाच्या २५ गुदामांपैकीं १९ गुदामें नुकतींच आगीच्या संपूर्णपणें भक्ष्यस्थानीं पडलीं. ह्या आगींत ३५,००,००० रुपयांचे चित्रपट जळून गेले. हें सर्व नुकसान मोशन पिक्चर्स असोसिएशनच्या सभासदांना सोसावें लागेल. कारण, ह्या चित्रपटांची जोखीम पत्करण्याचें विमा कंपन्यांनीं नाकारलेलें होतें. गुदामें पक्कीं बांधलेलीं नसल्यामुळें विमा कंपन्यांनीं जोखीम नाकारली.

**लाहोरमधील शिक्षणकेंद्र**—संयुक्त राष्ट्रसंघाच्या अन्न आणि शेती संघटनेतर्फे लाहोर येथें एक शिक्षणकेंद्र चालविण्यांत येत आहे. आर्थिक विकासाच्या योजना कशा अमलांत आणावयाच्या त्याचें शिक्षण येथील केंद्रांत देण्यांत येणार आहे. शिक्षण देण्यासाठी ६ पासून ८ पर्यंत आंतरराष्ट्रीय तज्ज्ञ ह्या संस्थेंत काम करणार आहेत. व्यवस्थापकीय व तांत्रिक कारभार हांकण्याचें शिक्षण केंद्रांत देण्यांत येणार आहे.


## कूळ व शेतजमीन कायदा

आवृत्ती दुसरी प्रसिद्ध झाली. किं ४ रु. कूळकायदा ( १९३९ ) आवृत्ति ३ री किं. ३ रु., तुकडेबंदी व जमीन एकत्रीकरण कायदा किं २ रु. भाडेनियंत्रण कायदा किंमत २ रु., शेतकरी कर्जनिवारण कायदा किं. ४॥ रु., मुंबई सावकारी कायदा किं. २॥ रु., द्विभार्या–प्रतिबंधक कायदा ( आवृत्ति ३ री ) किंमत १ रु., हिंदु घटस्फोट कायदा किं. १ रु., खंडपावत्यांचें पुस्तक ८ आणे.

पत्ता:–लॉ ॲकॅडेमी, ७२० सदाशिव, पुणें २

वाचकांचा पत्रव्यवहार

## कारकुनांची आर्थिक स्थिती कशी सुधारेल ?

### श्री. कुलकर्णी ह्यांची उपाययोजना

संपादक 'अर्थ' यांस सा. न. वि. वि.

आपल्या दि. १७ मे च्या अंकांत श्री. कुलकर्णी ह्यांनीं एका मध्यमवर्गीय कारकुनाचें अंदाजपत्रक दिलें आहे. त्यांतील तपशील आमचे बँकेंतील अनेक कारकुनांनीं पडताळून पाहिला, तेव्हां खर्चाचे बहुतेक आंकडे जमले. परंतु त्यांत आवश्यक अशा कित्येक बाबी समाविष्ट नाहींत हें लेखकानेंच मान्य केलेलें आहे. "मध्यम वर्गीयांच्या परिस्थितींतून मार्ग काढण्यांत मार्गदर्शन करणारा लेख लवकरच सादर करीत आहे" असें त्या लेखाचे शेवटीं म्हटलें होतें. आम्ही त्या लेखाची उत्कंठेनें वाट पहात होतो. परंतु, दि. ७ जून च्या अंकांत तो प्रसिद्ध झाला, तो वाचून पहातां निराशा झाली, असें म्हणणें भाग आहे. पगारवाढ आवश्यक आहे हें निर्विवाद आहे. खर्चांतहि काटकसर हवी, पण अत्यंत कष्टमय जीवन जगणाऱ्या माणसाला विरंगुळा म्हणून कांहीं फालतू व्यसन जरूरीचें असतें. तो आवश्यक खर्चच समजला पाहिजे. त्याच्या अभावीं त्याला जगणें अशक्य होईल. रोजची तातडीची गरजच जेथें भागणें अशक्य तेथें सेव्हिंग्ज स्कीमला कोठून वाव उरणार ? शक्यतों उधारी टाळण्याचा सल्ला अत्यंत बहुमोल आहे. शक्य त्या गोष्टी घरीं कराव्या हेंहि मान्य. दोन–चार वर्षांतून एकादा सत्यनारायण किंवा फिस्ट किंवा सिनेमा–आइस्क्रीम ह्यांस चैन म्हटलं, तर चैनीची व्याख्याच बदलली पाहिजे. "जिवंत मरण" टाळण्यासाठी तर आमचा प्रयत्न चालू असतो. विमा उतरला पाहिजे, पण त्याच्या हप्त्याला मासिक बजेटांत वाव आहे काय ? जोडधंदा किती लोकांना मिळूं शकेल व करतां येईल ? थोडक्यांत म्हणजे, एकादा कारकून खडतर तपश्चर्या करून कर्जबाजारीपणा टाळूं शकेल, परंतु उपाययोजना हवी ती बहुसंख्य कारकुनांना उपयोगी पडेल अशी पाहिजे. अशी योजना कोणी सांगूं शकेल काय? श्री. कुलकर्णी ह्यांनीं उपाययोजना सुचविली आहे, तिचा उद्देश स्तुत्य असला तरी आम्हां त्रस्त कारकुनांना त्यांतून मार्ग काढतां येईल असा विश्वास वाटत नाहीं. काटकसरीची परमावधि वातुकच होण्याची भीति वाटते. आमची माणुसकी नष्ट होऊं न देतां काय करतां येईल, हें पहाणें महत्त्वाचें आहे.

एक कर्जबाजारी बँक कारकून

---

### दि फर्टिलायझर्स अँड केमिकल्स त्रावणकोर लि.

१९४९ मध्यें वरील कंपनीनें बरीच प्रगति केली. दररोज १५० टनांची उत्पादनक्षमता असतांना प्रत्यक्ष उत्पादन ७१ टन झालें, तरी कंपनीस तोंड द्याव्या लागणाऱ्या आपत्तींच्या मानानें हें उत्पादन समाधानकारकच समजलें जात आहे. कंपनीला मोठ्या भांडवलाची गरज आहे. १९४९ मध्यें कंपनीनें २५,९२७ टन अमोनियम सल्फेट व ११,२३३ टन सुपरफॉस्फेट उत्पादन केलें. वर्षअखेर, कंपनीनें यंत्रसामुग्रीचें आयुष्य १४ वर्षांचें धरून २४,९४,१८० रु. घसारा काढून ९,३२,८३३ रु. नफा मिळविला. पूर्वीचा ९,१३,९७५ रु. तोटा वजा घालून बाकी नफा पुढील हिशेबांत ओढला.

### ग्रेट ब्रिटनमध्यें परदेशी प्रवासी

१९४९ सालीं ग्रेट ब्रिटनला ४,२४,००० प्रवाशांनीं भेट दिली. त्यापैकीं सुमारें १,००,००० प्रवासी अमेरिकन होते.

बेडेकर
लोणच्याचा
तयार मसाला

'अर्थ' ग्रन्थमाला.
१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ हिंदुस्थानची रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली
४ सहकार

दि सांगली स्टेट सेंट्रल को–ऑपरेटिव्ह बँक लि., सांगली
( स्थापना सन १९२७ )

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | ५,००,००० रु. |
| खपलेलें भांडवल | १,९३,५०० रु. |
| भरलेलें भांडवल | १,१४,२३० रु. |
| रिझर्व्ह व इतर फंड | १,१७,५४३ रु. |
| खेळतें भांडवल | १५,५१,०८८ रु. |

या बँकेंत मुदतीच्या, सेव्हिंग व करंट ठेवी स्वीकारल्या जातात. बँकेचे सभासदांना, सोसायट्यांना व व्यक्तिशः भागीदारांना योग्य तारणावर कर्जें दिलीं जातात. सोन्याचे तारणावर सवलतीचे व्याजाचे दरानें कर्ज दिलें जातें. वेस्टर्न इंडिया लाइफ इन्शुअरन्स कंपनी लि. सातारा व इंडिया इक्विटेबल इं. कं. लि. कलकत्ता, या कंपन्यांचे विम्यांचे हप्ते स्वीकारले जातात. चेक–हुंड्यांची खरेदी-विक्री, सरकारी कर्जरोखे व शेअर्स यांची खरेदी-विक्री व व्याज-वसुली वगैरे

सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार
या बँकेमार्फत केले जातात.

ना. पां. ठाणेदार, मॅनेजर
भ. अं. दप्तरदार, बी. ए., चेअरमन.

DECCAN INSTITUTE OF COMMERCE, POONA.
( Recognised by Govt. )

Classes for the 1950–51 Session will begin on Tuesday the 20th June 1950. Students coached up for G. D. C., L. C. C., D. Com. ( I. M. C. ), C. A. ( Ist ), G. D. C. and A., Shorthand and Typewriting. Courses suitable for Graduates, S.S.C. students, Matriculates and non-Matriculates. Morning and evening classes. Prospectus free on application to:

Deccan Institute of Commerce Building, 594 Budhwar Peth, Jijamata Bag corner, Poona 2. — *Secretary.*

## पुणें सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड, पुणें.

### पौड शाखेचें उद्घाटन

पुणें सेंट्रल को ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड या बँकेची एक शाखा मुळशी तालुक्यांतील शेतकऱ्यांचे सोयीसाठी ता. ३१ मे १९५० रोजीं पौड येथें श्रीयुत भालचंद्र महेश्वर उर्फ बापूसाहेब गुप्ते यांचें हस्तें उघडण्यांत आली. सदर समारंभासाठी बँकेचे बहुतेक सर्व डायरेक्टर व माजी डायरेक्टर पौड येथें गेले होते. पौड मार्गांतील शेतकरी, व्यापारी व सरकारी अम्मलदार वगैरेहि फार मोठ्या संख्येनें उपस्थित होते.

बँकेचे चेअरमन, श्री. ग. र. तुळशीबागवाले यांनीं आपल्या स्वागतपर भाषणांत बँकेच्या कामकाजाची माहिती सांगितली व मुळशी भाग हा सर्व प्रकारें मागासलेला असल्यानें तेथील खेडे-गांवांतून ठिकठिकाणीं सहकारी संस्था स्थापन करून त्यांचे मार्फत इकडील शेतकऱ्यांच्या साम्पत्तिक स्थितींत जितकी सुधारणा करण्यासारखी आहे तितकी करण्याचा बँक कसोशीनें प्रयत्न करील व त्यासाठींच पौड शाखा काढण्यांत येत आहे हें जम-लेल्या शेतकऱ्यांस विशद करून सांगितलें.

त्यानंतर मुळशी तालुक्यांतील प्रमुख काँग्रेस कार्यकर्ते श्री. देवराव देशमुख व श्री बाबुराव रायरीकर यांनीं पौड शाखेकडून शेतकऱ्यांची सेवा कशी होण्यासारखी आहे हें सभेंत थोडक्यांत सांगितलें. बँकेचे माजी चेअरमन श्री. यशवंतराव ओगले व 'अर्थ' साप्ताहिकाचे संपादक श्री. श्री. वा. काळे यांनीं सेंट्रल को. बँक जिल्ह्यांत शाखा काढून त्यांचे मार्फतीनें सहकारी चळवळीचा प्रसार करीत आहे हें सांगून शेतकऱ्यांनीं व लहान-लहान व्यापाऱ्यांनीं पौड शाखेचा पुरेपूर उपयोग करून घेऊन आपली स्थिति सुधारावी असें जमलेल्या लोकांस सांगितलें.

उद्घाटन समारंभाचे अध्यक्ष श्री. बापूसाहेब गुप्ते यांनीं पौड शाखा आजपासून सुरू झाल्याचें घोषित करून सहकारी बँका या सर्वस्वीं लोकांच्या, व त्यांच्याच उपयोगासाठीं त्या अस्तित्वांत आल्या असल्यानें अशा बँकांकडे शेतकऱ्यांनीं व लहान लहान व्यापाऱ्यांनीं विशेष आस्थेवाईकपणें पाहून त्या बँकांच्या व्यवहाराचा जितका जास्त फायदा करतां येईल तेवढा करण्यास त्यांना शक्य ती मदत व सहकार्य करावें असें अधिकारवाणीनें सांगितलें. इतर प्रकारच्या संस्था व सहकारी संस्था यांच्या कामकाजांत फार मोठा फरक असतो असें सांगून शेतकऱ्याच्या व लहान लहान व्यापाऱ्याच्या हिताच्या दृष्टीनें सहकारी संस्था ह्या त्यांना का व कशा विशेष उपयोगी पडतात तें स्पष्ट पण सुलभ भाषेंत सभेस समजाऊन दिलें व शेवटीं या शाखेचा विस्तार लवकरच फार मोठा होऊन तिचे छायेखाली येथील सर्व शेतकऱ्यांस आश्रय मिळावा अशी इच्छा प्रगट केली.

जमलेल्या मंडळींचे श्री. द. सो. टिळेकर यांनीं आभार मानले. समारंभाचे अध्यक्ष व समारंभासाठी दरगावाहून आलेले पाहुणे यांनीं पौड येथे येण्यास जी तसदी घेतली त्याबद्दल त्यांचे बोर्डा-तर्फे विशेष आभार मानले. शेवटीं पानसुपारी होऊन समारंभ संपल्याचें अध्यक्षांनीं जाहीर केलें.

पौड शाखेचे एजंट म्हणून बँकेनें श्री. शंकर नागेश सरनाईक यांची नेमणूक केली आहे. श्री. सरनाईक यांना हा भाग विशेष परिचित आहे.


# भोर स्टेट बँक लि.

[ स्थापना : १९४४ ]

मुख्य कचेरी:-भोर, जि. पुणें.

शाखा:-पुणें, पाली व शिरवळ.

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. ५,००,००० |
| खपलेलें भांडवल | रु. ५,००,००० |
| वसूल भांडवल | रु. २,५०,००० |
| गंगाजळी व इतर फंडस् | रु. ६९,६०० |

बोर्ड ऑफ डायरेक्टर्स

श्री. म. व्यं. शिंगरे, अध्यक्ष. — न. भू. ना. पां. थोपटे, उपाध्यक्ष.
रावसाहेब य. द. खोले. — श्री. चं. रा. राठी.
श्री. के. वि. केळकर, एम्. ए., एल्एल्. बी. — श्री. बा. ग. धंदुके.

बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

बँक १ ते ४ वर्षें मुदतीसाठी कायम ठेवी स्वीकारते.

दराबाबत समक्ष चौकशी करावी

पुणें कचेरी:-बुधवार घ. नं. ३६१-६२, पासोड्या विठोबा नजिक

अधिक माहितीसाठी लिहा.

रा. गो. आगाशे, बी. ए. ( ऑ. )
मॅनेजर.








हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए. यांनीं 'दुर्गाधिवास', ८२३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.